# पंचायत राज

Sunny shinde, Osmanabad (9823233781)

# पंचायतराज

- पंचायत राज हे **महात्मा गांधी** यांचे **स्वप्न** होते. त्याला "**पंचायत राज**" हे नाव **पडीत नेहरु** यांनी दिले.
- **१९५२** साली "**सामुदाय विकास कार्यक्रम**" तसेच **१९५३** साली "**राष्ट्रीय विस्तार कार्यक्रम**" भारत सरकार सुरु करण्यात आला.
- **१९५२** मध्ये भारत शासनाने "**कुटुंब नियोजन कार्यक्रम (मुंबई)** " सुरु केला व हा कार्यक्रम पुढे **१९६५** मध्ये **जि. प. कडे** हस्तांतरीत करण्यात आला.
- **१९५४** साली **देशातील सर्वोच्च बहुमान** असलेला "**भारतरत्न**" हा पुरस्कार सुरु करण्यात आला. तसेच **१९५५** मध्ये **भारतीय नागरीकत्व कायदा** संमत करण्यात आला.
- **१९५७** साली **सामुदाय विकास कार्यक्रम** व **राष्ट्रीय विस्तार कार्यक्रमाचे** अवलोकन करुन शिफारशी सुचविण्याकरीता **बलवंतराय मेहता समीती** नेमण्यात आली. बलवंतराय मेहता समीतीने आपला **अहवाल १९५८** मध्ये **सादर केला**. अहवालामध्ये बलवंतराय मेहता समीतीने "**त्रिस्तरीय पंचायतराज**" ची शिफारस केली होती व **पंचायत समीती** ला "**सर्वोच्च दर्जा**" सुचविला होता. त्यानुसारच **०२ ऑक्टो १९५९** रोजी पंचायत राज व्यवस्था सर्वप्रथम **राजस्थान** राज्यातील "**नागोर**" या जिल्हयात स्विकारण्यात आले. या योजनेचे उद्‍घाटन भारताचे पहीले पंतप्रधान **पंडीत नेहरु** यांचे हस्ते करण्यात आले.
- **महत्वाचे :-** महाराष्ट्र शासनाने **कमाल जमीन धारणा कायदा - १९६२** मध्ये अंमलात आणला. या कायद्यामध्ये **१९७५ मध्ये सुधारणा** करण्यात आल्या.
- **२० ऑक्टो १९६७** रोजी महाराष्ट्रात "**विधान परीषद**" अस्तित्वात आली. सदर विधान परीषदेचे **पहीले अध्यक्ष** हे "**वि. स. पांगे**" हे होते. **रोजगार हमी योजनेवर पहीला कायदा** महाराष्ट्र शासनाने **१९७९** रोजी **सांगली** जिल्हयातील **तासगाव** गावी राबविण्यात आला. **राष्ट्रीय रो. ह. यो.** ची सुरुवात संपुर्ण भारतामध्ये ०२ फेब्रु २००६ रोजी **आंध्रपदेश** राज्यातुन सुरुवात करण्यात आली. या योजने अंतर्गत ३६५ दिवसांपैकी **१०० दिवस** रोजगार मिळण्याची **हमी** देण्यात आली. **राष्ट्रीय रो. ह. योजनेस** २००९ मध्ये **महात्मा गांधी** यांचे नाव देण्यात आले आहे. कौन बनेगा करोडपती या कार्यक्रमात पाच कोटी जिंकणारा **सुशीलकुमार, बिहार** यास **राष्ट्रीय रो. ह.** योजनेचा बँड अँबेसीडर करण्यात आले आहे.
- बलवंत राय मेहता समितीने अहवालामध्ये **जिल्हा परिषद, पंचायत समीती, ग्रामपंचायत** असे **०३ स्तर** सुचविले. त्यानुसार जिल्हा स्तरावर जिल्हापरीषद, गट स्तरावर पंचायत समीत, स्थानिक ग्रामीण स्तरावर ग्रामपंचायत काम करील असे सुचविले.
- स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये **सर्वात निम्न** स्तरावर "**ग्रुप ग्रामपंचायत**" काम करते. ग्रामपंचायत स्थापन करण्याकरीता **कमीत कमी ६००** लोकसंख्या असणे आवश्यक आहे. डोगरी भागात **४५०** लोकसंख्या असणे आवश्यक आहे.
- **१९७७** मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कामकाजाचे मुल्यांकन करण्यासाठी व नवीन सुचना सुचविण्यासाठी केंद्र शासनाने "**अशोक मेहता**" यांच्या अध्यक्षतेखाली समीती नेमली. या समीतीने आपल्या अहवालामध्ये **द्विस्तरीय पंचायत राज** व्यवस्था (जिल्हा स्तरावर जिल्हा परीषद व ग्राम स्तरावर ग्राम पंचायत) करण्याचे सुचविले व **पंचायत राज** हा स्तर **पुर्णपणे वगळण्याची शिफारस** केली. अशोक मेहता समितीच्या शिफारशी नुसार **कर्नाटक** व **तामीळनाडु** यांनी द्विस्तरीय पंचायतराज व्यवस्था स्विकारली.
- महत्वाचे :- **जिल्हा नियोजन आयोगाची** स्थापना १९७४ साली झाली. त्यानुसार या आयोगाचे अध्यक्ष पालकमंत्री, उपाध्यक्ष विभागीय आयुक्त, सचिव जिल्हाधिकारी हे असतात.
- **प्रशासन व्यवस्था** हा घटक समाजाचे दृष्टीने उपयुक्त असतो. केंद्र स्तरावर केंद्र प्रशासन हे काम पाहते. राज्य स्तरावर राज्य शासन काम पाहते. **स्थानिक** स्तरावर **स्थानिक स्वराज्य संस्थेचे** मार्फतीने स्थानिक प्रशासन काम पाहते. स्थानिक स्वराज्य संस्था या आपले कायदे बनवु शकत नाही. वरीष्ठांनी केलेले कायदे ते अंमलात आणत असतात. **वॉरन हेस्टींग** या गव्हर्नर जनरल ने **१७७२** मध्ये पहील्यांदाच **जिल्हाधिकारी**

या पदाची निर्मीती केली. नंतर **१७७३** मध्ये "**रेग्युलेटींग ॲक्ट**" हा कायदा अस्तीत्वात आला. **१७८४** मध्ये रेग्युलेटींग ॲक्ट मधील त्रुटी दुर करण्यासाठी "**पिट्स इंडीया ॲक्ट**" अस्तीत्वात आला.

- **१८८२** मध्ये **लॉर्ड रिपन** या व्हाईसरॉय ने स्थानिक स्वराज्य संस्थेचा कायदा केला. त्यानेच "**तालुका बोर्ड व जिल्हा लोकल बोर्डाची**" स्थापना केली. या बोर्डावर जनतेने निवडुण दिलेला प्रतिनीधी नियुक्त करण्यात आला म्हणुन **लॉर्ड रिपन** यास "**स्थानिक स्वराज्य संस्थेचा जनक**" असे म्हणतात.
- १९३५ च्या भारत प्रशासन कायद्यानुसार देशामध्ये **१९३७** मध्ये प्रातीक सरकारच्या निवडणुका घेण्यात आल्या.
- १९४७ मध्ये **मुंबई हे राज्य** अस्तीत्वात आले. **बाळ गंगाधर खेर** हे या मुंबई राज्याचे पहीले मुख्यमंत्री होते.
- **१९५३ मध्ये फाजलअली** यांचे अध्यक्षतेखाली भाषावार प्रांत रचना आयोगाची रचना करण्यातआली. ०१ ऑक्टो १९५६ रोजी **भाषावार प्रांत** रचनेनुसार देशातील **पहिले** घटक राज्य "**आंध्रप्रदेश**" हे अस्तीत्वात आले. **०१ नोव्हें १९५६** रोजी **व्दिभाषीक मुंबई** व **कर्नाटक** राज्याची स्थापना करण्यातआली. **यशवंतराव चव्हाण** हे या व्दिभाषीक मुंबई या राज्याचे पहीले मुंख्यमंत्री होते. यांचे आत्मचरीत्र्याचे नाव "**कृष्णाकाठ**" हे होय. यांचे समाधीस्थळ "**प्रितीसंगम**" (कृष्णा व कोयना काठी) कराड येथे आहे.
- **१९५६** मध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीची सुरुवात झाली. **एस एम जोशी** यांचे नेतृत्वाखाली ही चळवळ अस्तीत्वात आली. मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र हे राज्य निर्माण व्हावे या करीता यांनी आंदोलने केली. १०५ जनांचे हुतात्म्य दिल्यानंतर **०१ मे १९६०** रोजी स्वतंत्र **महाराष्ट्र** राज्याची (मुंबई सह) निर्मीती करण्यात आली. स्वतंत्र महाराष्ट्राचे पहीले मुख्यमंत्री **यशवंतराव चव्हाण** हे होते. तत्कालीन **महसुल मंत्री वसंतराव नाईक** यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाने बलवंतराय मेहता समितीने सादर केलेल्या अहवालाचे मुल्यांकन करण्यासाठी व महाराष्ट्रासाठी पंचायतराज व्यवस्था सुरु करण्यासाठी समीती नेमली. वसंतराव नाईक समीतीने त्यांचा अहवाल **१९६१** मध्ये राज्य शासनास सादर केला. वसंतराव नाईक समितीच्या अहवालानुसार **जिल्हा परीषद व पंचायत समीती अधिनियम - १९६१** अस्तीत्वात आला. ०१ मे १९६२ रोजी महाराष्ट्र शासनाने पंचायत राज व्यवस्था स्विकारली व पंचायत राज व्यवस्था स्विकारणारे महाराष्ट्र हे **०९ वे** राज्य ठरले.
- **महत्वाचे :-** महाराष्ट्रातील ग्रामपंचाय या मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार **ग्रामपंचायती** अस्तीत्वात आल्या आहेत.
- **१९६५** मध्ये महाराष्ट्रात जिल्हा परीषदेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुक झाल्या.
- १९६५ मध्ये **महानगर पालीका व नगर पालीका अधिनीयम** अस्तीत्वात आला.
- १९६६ मध्ये **जमीन महसुल अधिनीयम** हा राज्यात अस्तित्वात आला.
- १९६७ मध्ये **ग्राम पोलीस अधिनीयम** हा कायदा अस्तित्वात आला.

.................................................000..................................................

# ग्रामपंचायत

- महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायती या **मुंबई ग्रामपंचायत अधिनियक १९५८** नुसार व भारतीय राज्य घटनेतील **कलम ४०** नुसार अस्तित्वात आल्या आहेत. ग्रामपंचायत ही लोकशाही विकेंद्रीकरणाची **कनिष्ठ स्तरावर** काम करणारी संस्था होय.
- **महत्वाचे :-** ग्रामपंचायत संदर्भात सर्वात पहीला कायदा ब्रिटीश सरकारच्या काळात **१९१५** साली करण्यात आला होता.
- महाराष्टातील ग्राम पंचायत निर्मीतीसाठी **किमान ६००** लोकसंख्या आवश्यक असते परंतु डोंगराळ भागात ही लोकसंख्या **किमान ४५०** इतकी निश्चित करण्यात आली आहे. यापेक्षाही कमी लोकसंख्या असल्यास दोन ते तीन खेड्यांची मिळुन एक **ग्रुप ग्रामपंचायत** अस्तित्वात येते. ग्रामपंचायतीची सदस्य संख्या, वार्ड, लोकसंख्या नुसार राखीव लागांची निश्चिती करण्याचे अधिकार **जिल्हा निवडणुक अधिकारी** या नात्याने **जिल्हाधिकारी** यांना आहेत.
- ग्रामपंयायत मध्ये **कमीत कमी ०७** व जास्तीत **जास्त १७** सदस्य असतात. हे निश्चीत करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतात.

| **लोकसंख्या** | **सदस्य संख्या** | **लोकसंख्या** | **सदस्य संख्या** |
|---|---|---|---|
| ६०० ते १५०० | ०७ | ४५०१ ते ६००० | १३ |
| १५०१ ते ३००० | ०९ | ६००१ ते ७५०० | १५ |
| ३००१ ते ४५०० | ११ | ७५०० पुढे | १७ |

- **ग्रामसभा :-** ग्रामसभेमध्ये गावातील १८ वर्षावरील सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांचा समावेश होतो.
- ग्रामपंचायत सदस्यांना **पंच** असे म्हणतात. पंचांची निवड **ग्रामसेभेमार्फत** प्रत्यक्ष निवडणुक पद्धतीने केली जाते. ग्रापंचायतीचे वार्ड व राखीव जागेंची संख्या निश्चीत करण्याचे अधिकार **जिल्हाधिकारी** यांना असतात. मात्र ग्रामपंचायतीचे वार्ड **तहसीलदार घोषीत** करतात.
- मतदाराचे **वय २१ वर्षे वरुन १८ वर्षे** करण्यासंदर्भाने **६१ वी** घटनादुरुस्ती १९८९ साली राजीव गांधी यांचे काळात करण्यात आली. नवीन तरतुदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना **५० टक्के** आरक्षण देण्याचे राज्य शासनाने घोषीत केले आहे.
- ग्रामपंचायत सदस्य निवड प्रक्रीयेमध्ये इतर मागासवर्गीय वर्गांना **२७ टक्के** आरक्षण देण्यात आले आहे. अनुसुचीत जाती व जमातींना आरक्षण **लोकसंख्येच्या प्रमाणानुसार** देण्यात येते.
- ग्रामपंचायतीचा कार्यकाल सर्वसाधारण स्थितीत **०५ वर्षे** असतो. तो ग्रामपंचायतीच्या **०१ ल्या** सभेपासुन गणला जातो. ग्रामपंचायतीचा कार्यकला वाढविण्याचे अधिकार **राज्य शासनास** आहेत. परंतु ग्रामपंचायतीचा वाढीव काळ हा **साडेपाच** वर्षापेक्षा अधिक असु शकत नाही.
- ग्रामपंचायतीची निवडणुक ही प्रत्यक्ष **पौढ व गुप्त मतदान** पद्धतीने होते. ग्रामपंचायतीची निवडणुक लढविण्याऱ्या उमेदवाराचे **वय २१ वर्षे** असावे लागते. दोन पेक्षा जास्त आपत्य असल्यास त्या व्यक्तीस ग्रामपंचायतीची निवडणुक लढवीता येत नाही. ग्रामपंचायतीचे सदस्य हे निवडुण आल्यानंतर आपल्यातुनच एकाची सरपंच म्हणुन व दुसऱ्याची उपसरपंच म्हणुन निवड करतात. सरंपच पदाची निवड ग्रामपंचायतीच्या **पहील्या सभेत** केली जाते. ही पहीली सभा बोलावण्याचे अधिकार **तहसीलदार** किंवा त्यांनी प्राधिकृत केले अधिकारी यांना आहेत.
- **सरपंच :-** ग्रामपंचायतीचा वास्तवीक **कार्यकारी प्रमुख** असतो. नवीन मतदान होवुन पहिल्या ग्रामपंचायत सभेमध्ये नवीन सरपंचाची निवड होई पर्यंत जुना सरपंच हा **काळजीवाहु सरपंच** म्हणुन काम पाहत असतो. सरपंच हा गावातील **ग्राम शिक्षण समीती** अध्यक्ष असतो. सरपंचाच्या अनुपस्थितीत उपसरपंच त्याचा कार्यभार संभाळतो.

- **सरपंचाची निवड व राखीव जागा :-** सरपंच व उपसरपंच यांची निवड करण्यासाठी बोलाविण्यात आलेल्या **बैठकीचे अध्यक्ष** स्थान जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेला अधिकारी **(प्रांत अधिकारी किंवा तहसीलदार)** भुषवित असतो. सरपंच व उपसरपंच यांच्या निवडणुकमध्ये समान मते मिळाल्यास सभेच्या अध्यक्षांसमोर **चिठ्ठया उधळुन** निवड प्रक्रिया पुर्ण केली जाते. सरपंच व उपसरपंच यांच्या निवडणुकीमध्ये संबंधात काही तक्रार असल्यास **१५** दिवसाचे आत **जिल्हाधिकारी** यांचे कडे दाद मागता येते व त्यानंतरही समाधान न झाल्यास पुढील **१५** दिवसात **विभागीय आयुक्तांकडे** दाद मागता येते.
- **महत्वाचे :-** सरपंचाची पदे राखीव पद्धतीने ठेवण्याचे अधिकार **राज्य शासनास** आहेत. जिल्हयातील एकुण ग्रामपंचायतीच्या **१/३ पदे** (३३ टक्के) महीला सरपंचासाठी राखीव असतात. मागास प्रवर्गासाठी ही पदे २७ टक्के निश्चीत करण्यात आलेली आहेत. अनुसुचीत जाती जमाती साठी जिल्हयातील एकुण लोकसंख्येचा विचार केला जातो. **उपसरपंच हे पद राखीव नाही.**
- **राजीनामा :-** ग्रामपंचायतीचे सदस्य व उपसरपंच आपला राजीनामा सरपंचाकडे देतात. तर **सरपंच** आपला राजीनामा **पंचायत समीतीच्या सभापती** कडे देतो.
- **अविश्वास ठराव :-** सरपंच व उपसरपंच यांच्या विरुदध अविश्वास ठराव संमत करायचा असल्यास हा ठराव ग्रामपंचायतीतील **१/३ सदस्यांनी** मांडावा लागतो. परंतु निवडणुकी नंतरच्या **पहील्या ०६ महीन्यात** हा ठराव मांडता येत नाही. अविश्वास ठरावाची पुर्व सुचना तहसीलदारांना द्यावी लागते. सुचना प्राप्त होताच तहसीलदार **०१** आठवडयाचे आत ग्रामपंचायतीची सभा बोलावतात. या सभेचे अध्यक्षस्थान ते स्वतः भुषवितात. अविश्वास ठराव संमत होण्यासाठी एकुण सदस्यांचे **२/३ सदस्यांचे** बहुमत असावे लागते. महीला सरपंचाबाबत हे प्रमाण **३/४** एवढे असावे लागते. असा अविश्वास ठराव फेटाळला गेल्यास पुढील **०१** वर्ष तो मांडता येत नाही. गैरवर्तनुक, असभ्यता, कामतील दिरंगाई इत्यादी कारणांवरुन **सरपंच, उपसरपंच व सदस्य** यांना पदच्युत करण्याचा अधिकार **जिल्हा परिषदेच्या स्थायी समीतीस** आहे. स्थायी समीतीच्या निर्णयावर दाद मागायची असल्यास **३०** महीन्यांचे आत **विभागीय आयुक्तांकडे** दाद मागता येते.
- **सरपंचाचे मानधन** :- सरपंचास ग्रामपंचायतीच्या एकुण उत्पन्नाच्या २ टक्के (५०००रु) मानधन दिले जाते.
- **सरपंचाची कार्ये :-** सरंपंच हा **ग्रामपंचायत व ग्रामसभा** तसेच **ग्रामपंचायत व पंचायत समीती** या मध्ये **समन्वय साधणारा दुवा** म्हणुन काम करतो. सरपंच हा ग्रामपंचायतीचा **वास्तवीक कार्यकारी प्रमुख** असतो. सरपंच हा ग्रामपंचायतीच्या बैठकीचे व ग्रामसभेच्या बैठकीचे **अध्यक्ष स्थान** भुषवितो. ग्रामपंचायतीच्या सभा बोलावुन त्याचे तो नियमन करीत असतो. ग्रामपंचातीतील अधिकारी व कर्मचारी यांचेवर सरपंचाचे नियंत्रण असते. पंचायत समीती, जिल्हा परीषद व राज्य शासनाने दिलेली माहीती तो ग्रामपंचायतीस कळविण्याचे काम सरपंच करतो.
- **सभा :-** ग्रामपंचायतीच्या **वर्षास १२ सभा** होतात. तर ग्रामपंचायत अंतर्गत **ग्रामसभेच्या** वर्षास **०६ सभा** होतात. सदर च्या **०६** सभा २६ जानेवारी, ०१ मे, १५ ऑगस्ट. ०२ ऑक्टोबर या दिवशी **०४** व इतर काळात **महीलांच्या ०२** सभा या प्रमाणे एकुण ०६ सभा होत असतात. ग्रामसभा व ग्रामपंचायती सभा बोलावण्याची जबाबदारी सरपंचाची असते. ग्रामसभेचे अध्यक्ष स्थान **सरपंच** भुषवितो. सरपंचाचे अनुपस्थितीत **उपसरपंच** तर दोघांचेही अनुपस्थितीत ग्रामपंचायतीचा **जेष्ठ सदस्य** हा अध्यक्ष स्थान भुषवितो. मात्र ग्रामपंचायतीच्या निवडणुकीनंतर आर्थिक वर्षातील पहील्या ग्रामसभेचे अध्यक्षपद हे **सरपंचासच** भुषवावे लागते. सरपंच हा **ग्राम शिक्षण समितीचा प्रमुख** असतो आणि गावातील शाळेचा **मुख्याध्यापक** हा सदर समितीचा **सचिव** असतो.
- मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ६३ नुसार ग्रामपंचायत आपले **अंदाजपत्र पंचायत समीतीस** सादर करते. ग्रामपंचायतीस आपले हिशोब दर वर्षास **ग्रामसभेसमोर** मांडावेच लागतात. ग्रामपंचायतीचे अंदाजपत्र पंचायत समितीस **०२** महीन्यांचे आत मंजुर करावे लागते किंवा त्यामध्ये दुरुस्त्या सुचवाव्या

लागतात. जर **०२** महीन्यांच्या आत पंचायत समितीने अंदाजपत्रक मंजुर नाही केले तर ते पंचायत समितीस मान्य आहे असे ग्राह्य धरले जाते. म्हणजेच ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकास **अंतीम** मान्यता **पंचायत समिती** देते. ग्रापंचायतीची **हिशोब तपासणी** मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी प्राधिकृत केलेला **विस्तार अधिकारी** करतो.

- **महत्वाचे :-** ज्या ग्रामपंचायतीचे वार्षीक उत्पन्न ५००० रु पेक्षा कमी आहे त्याची तपासणी जि. प. मार्फत होते. ५००० रु पेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतीची तपासणी **लेखापाल किंवा निधी लेखापाल** यांचे मार्फतीने केली जाते. ज्या ग्रामपंचायतीचे उत्पन्न २५००० रु पेक्षा जास्त आहे अशा ग्रामपंचायतीची हिशोब तपासणी **मुख्य लेखापाल** यांचे मार्फत केली जाते.
- **रहीमतपुर, जि. सातारा** हि महाराष्ट्रातील सर्वात **जुनी** ग्रामपंचायत आहे. महाराष्ट्रात सध्या २७,९०६ ग्रामपंचायती आहेत. अकलुज, जि. सोलापुर ही देशातील सर्वात श्रीमंत ग्रामपंचायत आहे.
- **ग्रामसेवक :-** ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीचा पदसिद्ध **सचिव** असतो. जि. प. च्या **ग्रामविकास** खात्याचा **वर्ग ३** चा सेवक असतो. राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला किंवा दोन किंवा अधिक ग्रामपंचातीला एका ग्रामसेवकाची नियुक्ती केली जाते. ग्रामसेवक हे पद मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे नेतृत्वाखाली जिल्हा निवड मंडळाकडुन नियुक्त केले जाते. ग्रामसेवकाची **बदली, पदोन्नती, नेमणुक, बडतर्फीचे** सर्व अधिकार हे **मुख्य कार्यकारी अधिकारी** यांना आहेत. ग्रामसेवकास वेतन जि. प. च्या **जिल्हा निधीतुन** दिले जाते.
- **ग्रामसेवकाची कामे :-**
  १) जन्म, मृत्यु, विवाह यांची नोदंणी करणे.
  २) पाणी पट्टी, घर पट्टी, इतर कर जमा करणे.
  ३) ग्रामसभा, ग्रामपंचायतीचे बैठकीस हजर राहुन इतीवृत्त लिहीणे.
- ग्रामसेवकावर नजीकचे नियंत्रण पंचायत समिती **गटविकास अधिकारी** यांचे असते तद्नंतर मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. यांचे असते.
- ग्रामपंचायती अंतर्गत **७९ विषयांचा** समावेश होतो. **उदा :-** सार्वजनिक आरोग्य, दिवाबत्तीची सोय, पाण्याचा पुरवठा, कुटीर उद्योग, ग्राम उद्योग, कृषी, पशु व जंगल संवर्धन व पौढ शिक्षण इ. कार्य पार पाडण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवर असते.
- मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील **कलम १४५ नुसार** अधिकाराचा दुरुपयोग, कर्तव्यात शिथीलता, दप्तर दिरंगाई, भ्रष्टाचार इत्यादी कारणांवरुन जि. प. शी विचारविनीमय करुन **राज्य शासन** ग्रामपंचायतीचे विसर्जन करते. संबंधीतांना आपली बाजु मांडण्याची संधी राज्य शासन देते. तसेच जर ग्रामपंचायतीचे **निम्यापेक्षा जास्त** सदस्य पदे रिक्त असल्यास राज्य शासन सदरच्या ग्रामपंचायतीचे विसर्जन करते.
- **महत्वाचे :- २०१०** हे वर्ष भारत सरकारने **ग्रामपंचायत वर्ष** म्हणुन घोषीत करण्यात आले होते.
- ग्रामपंचायत :- **७९ विषय.**
- पंचायत समिती :- **७६ विषय.**
- जिल्हा परीषद :- **१०८ विषय.**

.................................................ooo..................................................

# पंचायत समिती

- **महाराष्ट्र जि. प. व पं. स. अधिनियम १९६१** चे कलम ५६ प्रमाणे **पंचायत समितीची** निर्मीती करण्यात येते. स्थानिक स्वराज्य संस्थेतील पंचायत समिती ही **गट / तालुका स्तरावर** काम पाहते. त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेमध्ये पंचायत समिती ही मध्य स्तरावर कार्य करणारी संस्था आहे. पंचायत समिती ही जि. प. व ग्रामपंचायत यांचे मध्ये **समन्वय** साधन्याचे कार्य पार पाडते.
- **बलवंतराय मेहता** १९५८ समितीने **पंचायत समितीस** सर्वाधिक प्राधान्य दिले होते. तर वसंतराव नाईक १९६१ समितीने **जिल्हा परीषद** यास जास्त प्राधान्य दिले होते. दर **२०** वर्षांनी **मतदार संघ पुर्नरचना** करण्यात येते. २००९ ची मतदार पुर्नरचाना करण्यातआली त्याचे **अध्यक्ष न्या कुलदिप सिंह** हे होते. २००९ मध्ये ५४३ पैकी ४९९ मतदार संघांची हे पुर्नरचना करण्यात आली.
- **पंचायत समितीची रचना :-** १९६१ च्या अधिनियमानुसार पंचायत समितीत **कमीत कमी २१** व **जास्तीत जास्त ५०** सदस्य असतात. जिल्हयातील जि. प. च्या **०१** मतदार संघामध्ये पंचायत समितीचे **०२** मतदार संघ समाविष्ट होतात. **४००००** लोकसंख्येमागे जि. प. चा **०१** सदस्य निवडला जातो. तर **२००००** लोकसंख्येमागे पंचायत समितीचा **०१** सदस्य निवडला जातो. महाराष्ट्रातील सर्वात **मोठी** पंचायत समिती **कराड, जि. सातारा** ही होय. व सर्वात **लहान** पंचायत समिती **महाबळेश्वर, जि. सातारा** ही आहे.
- **महत्वाचे :-** जि. प. व पं. स. अधिनियम १९६१ मधील तरतुदींमध्ये **१९९४ मध्ये** दुरुस्ती करुन **नवीन कायदा** तयार करण्यात आला आहे. यानुसार पंचायत समितीतील **सहयोगी व स्विकृत सदस्य पद रद्द** करण्यात आले.
- **आरक्षण :-** अनुसुचित जाती व जमाती साठी गटातील एकुण लोकसंख्येच्या प्रमाणात असते तर मागासवर्गीयांसाठी **२७ टक्के** आरक्षण देण्यात येते. महाराष्ट्रात ओबीसी वर्गासाठी आरक्षण देण्यासाठी **बी. पी. मंडल आयोग** नेमण्यात आले होते. मराठा समाजासाठी आरक्षण देण्यासाठी **सराफ आयोग** नेमण्यात आला होता. सध्या महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (पंचायत समिती) मध्ये महीलांना **५० टक्के आरक्षण** देण्यात आले आहे.
- **पंचायत समिती सदस्य पात्रता :-** भारतीय नागरीकत्व, वय २१ पुर्ण, विकास गटातील कोणत्याही निर्वाचीत गटाच्या मतदार यादीत नाव असणे आवश्यक असते.
- पंचायत समितीचा सर्वसाधारण कार्यकाल **०५ वर्षाचा** असतो. हा कार्यकाल कमी जास्त करण्याचे अधिकार हे राज्य शासनास असतात. पंचायत समितीचे **विसर्जन** जि. प. व पंचायत समिती अधिनीयमातील कलम २६९ नुसार **राज्य शासन** करु शकते. विसर्जनाचे आधी त्या पंचायत समितीस आपली बाजु मांडण्याकरीता संधी दिली जाते.
- **सभापती व उपसभापती :-** पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणुक झाल्यानंतर **०१ ल्या** सभेत पंचायत समितीचे सदस्य आपल्यातुनच एकाची सभापती म्हणुन व दुसऱ्याची उपसभापती म्हणुन निवड करतात. या निवड पक्रीयेचे वेळी पंचायत समितीच्या **०१ ल्या** सभेत **जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी** या सभेचे अध्यक्ष स्थान भुषवितो. पंचायत समितीच्या सभापती व उपसभापतीची निवड करताना सम-समान मते पडल्यास अध्यक्षांसमोर चिठ्ठया टाकुन निवड केली जाते. या निवड प्रक्रीये बद्दल तक्रार असल्यास **३०** दिवसाचे आत विभागीय आयुक्त यांचे कडे दाद मागता येते. विभागीय आयुक्त यांचे निर्णयासंदर्भात कांही तक्रार असल्यास राज्य शासनाकडे पुढे **३०** दिवसाच्या आत दाद मागता येते.
- **महत्वाचे :-** पंचायत समिती सभापतीस ३००० रु व उपसभापतीस १५०० रु मानधन देण्यात येते.

- **राजीनामा :-** पंयायत समितीचे **सदस्य व उपसभापती** हे आपला राजीनामा पंचायत समिती **सभापतीकडे** सादर करतात. पंचायत समितीचा **सभापती** आपला राजीनामा **जि. प. अध्यक्षांकडे** सादर करतो.
- **अविश्वास ठराव** :- पंचायत समितीच्या सभेस उपस्थित राहणाऱ्या व मतदानाचा अधिकार असणाऱ्या सदस्यांपैकी **१/३** सदस्यांनी मागणी केल्यास सभापती व उपसभापती यांच्या विरुद्ध अविश्वास ठराव मांडता येतो. पंचायत समितीच्या निवडुकीनंतर प्रथम **०६** महीन्यांमध्ये असा ठराव मांडता येत नाही. अविश्वास ठराव संमत करण्यासाठी **जिल्हाधिकरी किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी** हा सभेचा अध्यक्ष असतो. एकुण सदस्यांच्या **२/३** सदस्यांनी बहुमतानी हा ठराव पारीत करावा लागतो. महीला सभापती बाबत हे प्रमाण **३/४** इतके असणे आवश्यक आहे. एकदा हा ठराव फेटाळल्यास **वर्षभर** पुन्हा नविन ठराव **मांडता येत नाही.** गैरवर्तणुक, कर्तव्यात दिरंगाई, भ्रष्टाचार इ. कारणास्तव पं. स. च्या सभापतीस पदच्युत करण्याचे अधिकार **राज्य शासनास** आहे.
- **सभापतीची कार्ये व अधिकार :-** पंचायत समितीच्या सभा बोलाविणे व त्याचे अध्यक्ष स्थान भुषविणे. सभापतीस पं. स. च्या विवीध अधिकाऱ्यांकडुन कोणत्याही कामासंदर्भात अहवाल मागविण्याचे अधिकार आहेत. पंचायत समितीची वेळोवेळी मालमत्ता तपासण्याचे अधिकार सभापतीस आहेत. पंचायत समितीच्या सभापतीच्या अनुपस्थितीत उपसभापती हे काम पाहतात.
- **सभा :-** पंचायत समितीच्या **सभा** प्रत्येक महीन्यास एक प्रमाणे **वर्षात १२** होतात.
- पं. स. चे सदस्य परवानगी शिवाय सतत **३ महीने** व परवानगी सह सतत **६ महीने** पं. स. च्या सभेस अनुपस्थित राहील्यास त्यांचे सदस्य पद रद्द होते.
- **हिशोब तपासणी :-** पंचायत समितीची हिशोब तपासणी महाराष्ट्र शासनाचे **महालेखापाल** यांचे आदेशाने लेखापाल, स्थानिक निधी यांचे मार्फत केली जाते.
- देशाचे **महालेखा परीक्षक** रघुवीर सिंह हे आहेत.
- राज्याचे **महालेखापाल** विनोद रॉय हे आहेत.
- देशाचे **महान्यायवादी** गुलाम ई वहानवटी हे आहेत.
- राज्याचे **महाधिवक्ता** हे रवी कदम हे आहेत.
- **गट विकास अधिकारी ( BDO ) :-** पंचायत समितीचा **प्रशासकीय प्रमुख** असतो. गटविकास अधिकारी हा पंचायत समितीचा **पदसिद्ध सचीव** असतो. गटविकास अधिकाऱ्यावर नजीकचे नियंत्रण **मुख्य कार्यकारी अधिकारी** यांचे असते. गट विकास अधिकाऱ्याची निवड महाराष्ट्र लोकसेवा आयोग तर्फे केली जाते तर कांही जागा विस्तार अधिकाऱ्यांमधुन पद्‌दोन्नती मधुन भरल्या जातात.
- **गटविकास अधिकारी यांची कार्ये व अधिकार :-** पंचायत समितीचा मुख्य प्रशासकीय अधिकारी या नात्याने विकास कामांची अंमलबजावणी करणे, पंचायत समितीचा सचीव या नात्याने सर्व कागदपत्रे ही बीडीओंच्या ताब्यात असतात. पंचायत समितीच्या **वर्ग ३ व ४ च्या रजा मंजुर** करण्याचे अधिकार बीडीओंना असतात. पंचायत समितीच्या सभांना उपस्थित राहुन इतीवृत्त लिहीतो. पं. स. च्या **अनुदानातुन रकमा काढण्याचे अधिकार** बीडीओंना असतात.
- **पंचायत समितीचे महत्वाचे विषय** :- कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास, समाजकल्याण, शिक्षण आणि अस्पृष्यता निर्मुलन इ. पंचायत समितीकडे एकुण **७६ विषय** असतात.
- **महत्वाचे - सरपंच समिती :-** पंचायत समितीस सल्ला देण्याकरीता व मार्गदर्शन करण्यासाठी पंचायत समिती अंतर्गत सरपंच समितीची तरतुद केली आहे. सरपंच समितीमध्ये एका गटातील **१५ सरपंच** किंवा गटातील एकुण सरपंचाच्या १/५ सरपंच यापैकी जी संख्या मोठी असेल तेवढ्या सरपंचांचा समावेश सरपंच समितीमध्ये

होतो. सरपंच समितीचा **पदसिद्ध अध्यक्ष** हा पंचायत समितीचा **उपसभापती** हा असतो. सरपंच समितीचा **पदसिद्ध सचीव** हा **विस्तार अधिकारी** हा असतो.

- **सरपंच समितीचे कार्ये** :- पं. स. ला ग्रामपंचायत संदर्भात सल्ला देण्याचे व मार्गदर्शन करण्याचे अधिकार सरपंच समितीस असतात.कर्तव्यातील दिरंगाई, भ्रष्टाचार, अधिकारांचे उल्लंघन इ. कारणास्तव **पंचायत समितीचे विसर्जन** करण्याचे अधिकार **राज्य शासनास** आहेत.

..................................................ooo..................................................

## जिल्हा परीषद

- **लदाख, हिमाचल प्रदेश** हा देशातील सर्वात मोठा जिल्हा व **सर्वात मोठा मतदार संघ** आहे. देशातील सर्वात **लहान जिल्हा गारोहील, मेघालय** हा आहे. मेघालयाचे मुख्यमंत्री **मुकुंद संगमा** हे आहेत.
- महाराष्ट्रामध्ये ०१ मे १९६० रोजी २६ जिल्हे व २२९ तालुके होते. महाराष्ट्रात सध्या **३३ जिल्हा परीषद** आहेत.
- जिल्हा परीषदेस जास्त महत्व **वसंतराव नाईक समिती १९६०** यांनी दिला होता.
- जिल्हा परीषदेस **१०८ विषयांवर** निर्णय घेण्याचे अधिकार आहेत.
- **महत्वाचे :-** संसदेच्या संयुक्त बैठकीचे अध्यक्ष **लोकसभेचा अध्यक्ष** हे भुषवितात.
- जिल्हा नियोजन आयोग **१९७४** साली अस्तित्वात आला.
- महाराष्ट्र सरकारने २७ जुन १९६० रोजी तत्कालीन महसुल मंत्री वसंतराव नाईक यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीने **२२६ शिफारशी** सादर केल्या. वसंतराव नाईक समितीने तिन्ही स्तरातील **जिल्हा परीषदेस** सर्वाधिक प्राधान्य दिले.
- सध्या महाराष्ट्रात ३५ जिल्हे व ३५७ तालुके आहेत. महाराष्ट्रात सध्या ३३ जिल्हा परीषद आहेत. मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्हयांना ग्रामीण परीक्षेत्र जोडले नसल्याने त्या ठिकाणी जिल्हा परीषदा नाहीत.
- **जि. प. रचना :-** जिल्हा परीषदेमध्ये **महानगर पालीका, नगर पालीका, नगर पंचायत व कटक मंडळे** इत्यादीचा समावेश **नसतो.**
- **देशात** एकुण **६२** कटक मंडळे आहेत व त्यातील **महाराष्ट्रात ०७** कटक मंडळे आहेत.
- जि. प. सदस्य (निर्वाचीत) संख्या :- **कमीत कमी ५०** व **जास्तीत जास्त ७५** सदस्य असतात.
- महाराष्ट्रातील **सर्वात मोठी** जिल्हा परीषद **अहमदनगर** सदस्य-७५ व **सर्वात लहान हिंगोली व सिंधदुर्ग** सदस्य-५० ही आहे. दर **४००००** लोकसंख्ये मागे जिल्हा परीषदेचा एक प्रतिनीधी निवडला जातो.
- **सदस्य राखीव जागा :-** जिल्हा परीषदेतील आरक्षण राज्य शासन निश्चित करते. नविन घटना दुरुस्तीनुसार महीलांना ५० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. इतर मागसवर्गीय घटकांस २७ टक्के, तसेच अनुसुचित जा. ज. ना लोकसंख्येच्या प्रमाणानुसार आरक्षण देण्यात येते. अनुसुचित जा. व जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार ठरविण्यात आलेले सर्व सदस्यांपैकी १/२ महीला सदस्य असतात. जिल्हयातील सर्व **पंचायत समितीचे सभापती** हे जिल्हा परीषदेचे **पदसिद्ध सदस्य** असतात. परंतु त्यांना सभेत मतदान करण्याचा अधिकार **नसतो.**
- **जि. प. सदस्यांची पात्रता :-** भारतीय नागरीकत्व, वय २१ वर्षे पुर्ण, जिल्हा परीषदेच्या कोणत्याही मतदार संघातील मतदार यादीत नाव असावे लागते, तो वेडा किंवा दिवाळखोर नसावा. त्याने शासनाचे किंवा पंचायत संस्थेचे आर्थिक लाभाचे पद धारण केलेले नसावे. १२ डिसेंबर २००१ नुसार तिसरे आपत्य असणाऱ्यास जि. प. ची निवडणुक लढविता येत नाही.
- **जि. प. कार्यकाल :-** सर्वसाधारण परीस्थीतीत जि. प. चा कार्यकाल ०५ वर्षे इतका असतो. राज्य शासन जि. प. ला विशिष्ट परीस्थीतीमध्ये ०६ महीन्यांची मुदत वाढ देवु शकते. ०६ महीने संपताच जि. प. ची निवडणुक घेणे हे राज्य निर्वाचन आयोगावर बंधनकारक असते.

- जि. प. चे कामकाज चालविण्याकरीता जि. प. चे सदस्य आपल्यातील एकाची अध्यक्ष व एकाची उपाध्यक्ष म्हणुन निवड करतात. जि. प. ची सार्वत्रिक निवडणुक झाल्यानंतर **जिल्हाधिकारी** हे विशिष्ट तारीख निश्चित करुन जि. प. ची सभा बोलावुन अध्यक्ष व उपाध्यक्षाची निवड करतात. सदर सभेचे अध्यक्षपद हे **जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी** भुषवितो. **महत्वाचे :-** जि. प. चा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष हा सलग दोन वेळा पेक्षा जास्त सदरचे पद भोगु शकत नाही. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे निवड प्रक्रीयेच्या वेळी समसमान मते पडल्यास अध्यक्षांसमोर चिठ्ठ्या टाकुन निवड केली जाते. तरीही निवड संदर्भात वाद निर्माण झाल्यास ३० दिवसांचे आत विभागीय आयुक्तांकडे दाद मागता येते व त्यांचे हि निर्णया विरोधात पुढील ३० दिवसांत दाद मागता येते.
- **जि. प. च्या अध्यक्ष व उपाध्यक्षांचा कार्यकाल** हा ०२ जुन २००४ पासुन **२.५ वर्षे** करण्यात आलेला आहे.
- **मानधन :-** जि. प. अध्यक्ष यांना ५००० रु व उपाध्यक्ष यांना ४००० रु एवढे देण्यात येते.
- १९९३ साली जि. प. च्या अध्यक्षास **उपमंत्र्याचा** दर्जा देण्यात आला. १९९५ मध्ये उपमंत्र्याचा दर्जा काढुन जि. प. अध्यक्षास **राज्यमंत्र्याचा** दर्जा देण्यात आला.
- जि. प. चा **सदस्य व उपाध्यक्ष** आपला राजीनाम **जि. प. अध्यक्षांकडे** देतात. **जि. प. अध्यक्ष** हे आपला राजीनामा **विभागीय आयुक्तांकडे** आपला राजीनामा देतात.
- **अविश्वास ठराव :-** निवड प्रक्रीयेनंतर पहीले सहा महीने अविश्वास ठराव मांडता येत नाही. अध्यक्ष व उपाध्यक्षांवर अविश्वास ठराव मांडायचा असल्यास सभेत उपस्थित एकुण सदस्यांपैकी १/३ सदस्यांनी ठराव पारीत करावा लागतो. या बैठकीचे अध्यक्ष स्थान हे **जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी** हे भुषवितात. अविश्वास ठराव संमत होण्यासाठी निवडणु आलेल्या एकुण सदस्यांपैकी २/३ सदस्यांचे बहुमत आवश्यक असते. महीलांसाठी सदचे बहुमत ३/४ एवढे असणे आवश्यक असते. एकदा अविश्वास ठराव फेटाळल्यास तो पुढील एक वर्ष पुन्हा मांडता येत नाही.
- कर्तव्यात दिरंगाई, भ्रष्टाचार, बेजबाबदापणा, असमर्थता इत्यादी कारणांवरुन देखील अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना आपली बाजु मांडु देण्याचे अधिकार देवुन त्यांना पदावरुन दुर करण्याचे अधिकार **राज्य शासनास** आहेत.
  तसेच अकार्यक्षमता, आर्थिक दिवाळखोरी, बेजबाबदार प्रशासन इत्यादी कारणास्तव मुदतीपुर्वी **जि. प. बरखास्त** करण्याचे अधिकार **राज्य शासनास** आहेत.
- **मुंबई महानगरपालीका** पहील्यांदा **१८८८ च्या मुंबई महानगर पालीका अधिनीयम** अन्वये स्थापन करण्यात आली. नंतर १९४९ सालीच्या मुंबई प्रांतीक महानगर पालीका अधिनियक अन्वये इतर महानगर पालीका अस्तीत्वात आल्या.
- **जि. प. अध्यक्षांची कार्ये :-** जि. प. च्या सभा बोलाविणे व तिचे अध्यक्ष स्थान भुषविणे, अध्यक्षांचे अनुपस्थितीत उपाध्यक्ष हे सभेचे अध्यक्ष स्थान भुषवितात, जि. प. च्या कामकाजाचे नियमन व नियंत्रण करणे, जि. प. च्या वित्तीय व कार्यकारी प्रशासनावर देखरेख ठेवणे, जि. प. चे अभिलेख व कागदपत्रे तपासणे, स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष म्हणुन जबाबदारी पार पाडणे, राज्य शासनाने जि. प. कडे सोपविलेल्या योजनांची अंमलबजावणी करणे, मुख्यकार्यकारी अधिकाऱ्याच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.
- **जि. प. मधील समित्या** :- महाराष्ट्र जि. प. व पं. स. अधिनियक १९६१ चे कलम ७८ नुसार जि. प. मध्ये कामाची विभागणी करण्याकरीता समित्या निर्माण करण्याची तरतुद करण्यात आली आहे. आज जि. प. मध्ये एकुण **०९** समित्यांचा समावेश आहे. जि. प. च्या समित्यांचा कार्यकाल जि. प. एवढाच असतो.
  १) **स्थायी समिती :-** जि. प. मधील **सर्वात महत्वाची समिती**. यामध्ये **एकुण १५ सदस्य** असतात. यातील ०८ सदस्य हे जि. प. सदस्यांमधुन निवडले जातात. यामध्ये अनुसुचित जाती जमातीचे ०२ सदस्य असतात.

विशेष समित्यांचे सभापती हे स्थायी समितीचे पदसिदध सदस्य असतात. जि. प. चा अध्यक्ष स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. तर **उपमुख्य कार्यकारी अधिकारी** हा पदसिद्ध **सचिव** असतो.

**स्थायी समितीची कार्ये :-** जि. प. च्या दैनिक प्रशासनाचे आढावा घेणे, विशेष समित्यांवर नियंत्रण ठेवणे व त्यांचे कार्यात सुसुत्रता आणणे, जि. प. च्या अर्थ संकल्पास अंतिम मान्यता स्थायी समिती देते.

२) **शिक्षण समिती :-** एकुण सदस्य ०८ असतात. त्यांची निवड जि. प. च्या सदस्यांमधुन केली जाते. या समितीचा अध्यक्ष हा **जि.प. उपाध्यक्ष** हे सदर समितीचे **अध्यक्ष** असतात व **जिल्हा शिक्षण अधिकारी** हे पदसिद्ध **सचिव** असतात.

कार्ये :- जिल्यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा विकास करणे, शाळांसाठी इमारती व क्रिडांगणे उभारणे.

३) **आरोग्य समिती :-** एकुण सदस्य ०८ असतात. **जिल्हा आरोग्य अधिकारी** हे या समितीचे पदसिद्ध सचिव असतात.

कार्ये :- प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करणे, रोग प्रतिबंधक लसींचा पुरवठा करणे.

४) **वित्त किंवा अर्थ समिती :-** एकुण सदस्य ०८ असतात. जि. प. चे उपाध्यक्ष हे या समितीचे पदसिद्ध हे अध्यक्ष असतात व **मुख्यलेखा वित्त अधिकारी** हे पदसिद्ध सचीव असतात.

कार्ये :- जि. प. व पं. स. यांचे अंदाजपत्रकांची छाननी करणे व लेखा तपासणी अहवालाची छाननी करणे.

५) **सार्वजनिक बांधकाम समिती :-** एकुण सदस्य ०८ असतात. या समितीचे पदसिद्ध सचिव **कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग** हे असतात.

कार्ये :- जिल्यातील रस्ते व पुल यांचा विकास करणे, प्रशासकीय इमारतींचे बांधकाम करणे.

६) **कृषी व सहकार समिती :-** एकुण सदस्य ११ असतात. या समितीचे पदसिद्ध सचित हे **जिल्हा कृषी अधिकारी** हे असतात.

कार्ये :- कृषी अवजारे व बी बीयाणे यांचे वाटप करणे, गोदाम व्यवस्था व पीक स्पर्धा राबविणे.

७) **पशु संवर्धन व दुग्ध विकास :-** एकुण सदस्य ०८ असतात. या समितीचे पदसिद्ध सचिव हे **जिल्हा पशु संवर्धन अधिकारी** हे असतात.

कार्ये :- दुधार जनावरांची पैदास करणे, पशु वैदयकीय दवाखान्यांची व्यवस्था करणे, जनावरांचे प्रदर्शन, शेळया मेंढया कुकुटपालन या व्यवसायास प्रोत्साहन देणे.

८) **समाज कल्याण समिती :-** एकुण सदस्य ११ असतात. यामध्ये जि. प. ने निवडुन दिलेले ०९ सदस्य असतात. यापैकी ०५ सदस्य हे अनुसुचित जा. जमातीचे असतात व उर्वरीत ०२ महीला सदस्य असतात. या समितीचे पदसिद्ध सचिव **जिल्हा समाज कल्याण अधिकारी** हे असतात.

कार्ये :- अस्पृश्यता निर्मुलन, मागासवर्गीयासाठी विकास योजना.

९) **महीला व बालकल्याण :-** या समितीची स्थापना १९९२ साली झाली. यामध्ये एकुण ०८ सदस्य असतात. या समितीच्या सभापती पदी प्रत्यक्ष निवडुन आलेली महीला सदस्य असते. या समितीचे पदसिद्ध सचिव हे **जिल्हा महीला व बालकल्याण अधिकारी** असतात. या समितीमध्ये ७० टक्के महीला सदस्य असतात.

- **जलसंधारण व पेयजल पुरवठा समिती** ही जि. प. ची १० समिती होती. **१९९३ मध्ये** या समितीचे विलीनिकरन महामंडळात करण्यात आले. सद्य स्थितीत जि. प. च्या ०९ समित्या आहेत.
- **मुख्यकार्यकारी अधिकारी :- सी ई ओ :-** जि. प. व पं. स. अधिनियक १९६१ मधील कलम ९४ नुसार या पदाची तरतुद करण्यात आली आहे. **निवड :-** यु पि एस सी कडुन करण्यात येते. **नेमणुक** राज्य शासनाकडुन करण्यात येते. यांचे **वेतन** राज्याच्या निधीतुन देण्यात येते.
- **सी ई ओ ची कार्ये** :- जिल्हयातील गटविकास अधिकारी यांचेवर प्रत्यक्ष नियंत्रण असते. वसंतराव नाईक याचे शिफारशी नुसार स्वतंत्र आय ए एस अधिकाऱ्याची जि. प. चा प्रशासकीय अधिकारी म्हणुन ०३ वर्षांकरीता

नेमणुक करावी अशी शिफारस करण्यात आली होती. यांची **नेमणुक, बढती व बदली** चे सर्व अधिकार हे राज्य शासनास आहेत.

..................................................ooo..................................................

## नागरी स्थानिक स्वराज्य संस्था :-

## महानगर पालिका

- सध्या महाराष्ट्रात एकुण ०५ नगर पंचायत आहेत.
- देशातील पहीली महानगर पालीका **मद्रास** ही आहे. महाराष्ट्रातील सर्वात पहीली महानगर पालीका **मुंबई** ही आहे. सध्या महाराष्ट्रात एकुण २३ महानगर पालीका अस्तित्वात आहेत. महानगर पालिका स्थापन करण्याकरीता आवश्यक लोकसंख्या **३ लाखापेक्षा जास्त** असते. महाराष्ट्रात एकुण २२१ नगर पालीका अस्तित्वात आहेत. **नागरी** स्थानिक स्वराज्य संस्था मधील **सर्वोच्च संस्था** म्हणुन **महानगर पालीकेस** ओळखले जाते. भारतात महानगर पालीकेची सुरुवात ब्रिटीश काळापासुन झालेली आहे. ब्रिटीशांनी मध्यवर्ती शासनाचा भार कमी करण्यासाठी महानगर पालीका स्थापन केल्या त्या अनुशंगाने भारतातील पहीली महानगर पालीका **मद्रास महानगर पालीका** अस्तीत्वात आली. महानगर पालीका स्थापन करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे महानगरातील नागरीकांना मुलभुत सुविधा पुरविणे हा होय.
- सध्या महाराष्ट्रात एकुण २३ महानगर पालीका आहेत.

१) मुंबई महानगर पालिका (महाराष्ट्रातील पहीली महानगर पालिका १८८८)
२) ठाणे
३) पुणे
४) नागपुर
५) सोलापुर
६) कोल्हापुर
७) नाशिक
८) नविमुंबई
९) डोंबीवली
१०) उल्हासनगर
११) पिंपरी चिंचवड (आशिया खंडातील सर्वात श्रीमंत)
१२) सांगली
१३) मिरज - कुपवाड
१४) नांदेड - वाघाळा
१५) अहमदनगर
१६) अमरावती
१७) धुळे
१८) जळगाव
१९) मिरा भाईंदर
२०) अकोला
२१) औरंगाबाद
२२) भिवंडी निजामपुर
२३) वसई विरार

- **महत्वाचे :-** २०११ मध्ये महाराष्ट्र शासनाने नविन ०३ महानगर पालिकांना मान्यता दिली आहे.
  **१) लातुर** **२) परभणी** **३) चंद्रपुर (चंद्रपुरला** २०११ मध्ये ५०० वर्षे पुर्ण झाली आहेत)
- **महत्वाचे :-** महाराष्ट्र शासनाकडुन महानगर पालिका स्थापन करण्याकरीता काही निकष विचारात घेतले जातात. शहराची लोकसंख्या ०३ लाखापेक्षा जास्त असावी. त्या शहरातुन मिळणारे स्थानिक कर उत्पन्न ०१ कोटी रु असावे. त्या शहरातील जनमत हे महानगर पालिका निर्मीती करीता पुरक असावी. विद्यमान नगर पालिकेची आर्थिक स्थिती चांगली असावी. स्थानिक स्वराज्य संस्थेचा विषया राज्य सुचित येत असल्याने महानगर पालिका स्थापन करण्याचा अधिकार राज्य शासनास असतो. केंद्रशासीत प्रदेशातील महानगर पालिका संसद कायद्यानुसार केंद्र शासन स्थापन करते.
- महाराष्ट्र शासनाने महानगर पालिका व नगर पालिका अधिनियम **१९६५** मध्ये मंजुर केला. त्यानुसार राज्यात महानगर पालिकांची रचना करण्यात आली. **मुंबई** महानगर पालिका अधिनियम १८८८ मध्ये अस्तित्वात आला. **नागपुर** महानगर पालिका अधिनियक १९४८ मध्ये अस्तित्वात आला.
- **महत्वाचे :-** मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम १९४९ पासुन मुंबई व नागपुर महानगर पालिका सोडुन राज्यातील महानगर पालिका स्थापन करण्यात आल्या.
- **महत्वाचे :-** महाराष्ट्रातील नगर परिषद व नगर पंचायती या १९६५ च्या महानगर पालिका व नगर पालिका अधिनियमानुसार अस्तित्वात आल्या आहेत.
- **ग्राम** स्थानिक स्वराज्य संस्थेत **७३ व्या घटनादुरुस्तीनुसार १९९३** मध्ये बदल करण्यात आले.

- **नागरी** स्थानिक स्वराज्य संस्थेत **७४ व्या घटनादुरुस्तीनुसार १९९३** मध्ये बदल करण्यात आले.
- **महत्वाचे :-** महाराष्ट्र महानगर पालिका व नगर परीषद हा सुधारीत अधिनियम १९९४ मध्ये लागु झाल्या. या अधिनियमानुसार सध्या महाराष्ट्रातील नागरी स्वराज्य संस्थानचा कारभार चालतो.
- **महानगर पालिकेची रचना :-** महानगर पालिका मध्ये ०२ प्रकारचे सभासद असतात.
  १) निर्वाचित सभासद २) नामनिर्देशित सभासद.
- **निर्वाचित सभासद :-** महानगर पालिकेमध्ये प्रत्यक्ष पौढ मताधिकार पद्धतीने व गुप्त मतदान पद्धतीने जनतेकडुन प्रत्यक्ष निवडुण आलेल्या सभासदांना निर्वाचित सभासद म्हणतात. महानगर पालिकेच्या सदस्यास नगर सेवक या नावाने ओळखले जाते. नगर सेवक ही संकल्पना **बाळासाहेब ठाकरे** यांनी मांडली होती. महानगर पालिकेमध्ये **कमीत कमी ६५** व **जास्तीत जास्त २२३** एवढे सदस्य असतात. महानगर पालिका क्षेत्रातील एकुण लोकसंख्येच्या आधारे सदस्य संख्या निश्चित करण्याचा अधिकार **राज्य निर्वाचन आयोगास** असतो. राज्य निर्वाचन आयोग प्रादेशिक मतदार संघ निश्चित करतो. या मतदार संघास **वार्ड** असे म्हणतात.
- **महत्वाचे :-** ०३ ते ०६ लाख लोकसंख्येच्या महानगर पालिकेसाठी किमान ६५ व कमाल ८४ सभासद असतात.
- ०३ लाख संख्येनंतरच्या प्रत्येक १५००० लोकसंख्येसाठी एक सभासद वाढविला जातो.
- ०६ ते १२ लाख लोकसंख्येच्या पाढीमागे महानगर पालिकेमध्ये किमान ८५ व कमाल ११५ सदस्य असतात पुढे प्रत्येक २०००० लोकसंख्येसाठी एक सभासद वाढविला जातो.
- १२ ते १४ लाख लोकसंख्येच्या मागे महानगर पालिकेमध्ये किमान ११५ व कमाल १४५ सभासद असतात.
- १२ लाखाच्यापुढे ४०००० लोकसंख्येमागे एक सभासद वाढविला जातो.
- १४ लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असल्यास किमान १४६ व कमाल २२३ सदस्य संख्या असते.
- १४ लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असल्यास प्रत्येक १ लाख लोकसंख्येकरीता एक सदस्य वाढविला जातो.
- **म.न.पा. सभासद पात्रता :-** १) भारतीय नागरीकत्व २) २१ वर्षे वय पुर्ण ३) संबधीत महानगर पालिकेच्या मतदार यादीमध्ये नाव असणे आवश्यक ४) तो महानगर पालिकेचा थकवाकीदार नसावा. ५) कोणत्याही फौजदारी गुन्हयामध्ये शिक्षा झालेली नसावी.
- **म.न.पा.सभासदांकरीता आरक्षण :-** महानगर पालिकेतील अनुसुचित जाती जमातीची एकुण लोकसंख्या विचारात घेवुन त्यांना आरक्षण दिले जाते. इतर मागासवर्गीय वर्गांना (ओबिसी) २७ टक्के जागा राखिव असतात.
- नविन घटना दुरुस्तीनुसार **महिलांना ५० टक्के** आरक्षणाची तरतुद करण्यात आली आहे.
- महानगर पालिकेचा कार्यकाल :- सर्वसाधारण कार्यकाल ०५ वर्षाचा असतो. सहाजिकच सदस्यांचा कार्यकालही ०५ वर्ष इतका असतो. महानगर पालिकेच्या सदस्यांना देखील नगरसेवक असे म्हणतात.
- **महानगर पालिकेचे पदाधिकारी :-** मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम १९४९ अंतर्गत महानगर पालिकेसाठी **महापौर** व **उपमहापौर** या पदाधिकाऱ्यांची तरतुद करण्यात आली आहे.
- महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये शहरातील मतदार महानगर पालिका सभासदांना निवडुण देतात. महानगर पालिकेच्या बोलावलेल्या पहील्या बैठकीत सदस्य आपल्यातुनच एकाची महापौर व एकाची उपमहापौर म्हणुन निवड करतात. सदरच्या निवड संदर्भात बोलावलेल्या बैठकीचा अध्यक्ष हा **जिल्हाधिकारी** असतो.
- **महापौर आरक्षण :-** राज्यातील महापौर पदांची एकुण पदे व अनुसुचित जाती व जमातींची एकुण लोकसंख्या विचारात घेवुन लोकसंख्येच्या प्रमाणात कांही पदे ही राखिव ठेवली जातात. राज्यातील एकुण महापौर पदांपैकी २७ टक्के पदे इतर मागासवर्गीय वर्गांना असतात. राज्यातील एकुण महापौर पदांपैकी ५० टक्के पदे महिलांकरीता राखिव असतात.
- **महापौर व उपमहापौर यांचा कार्यकाल :-** महानगर पालिकेच्या सर्वसाधारण बैठकीमध्ये जेंव्हा महापौरांची निवड होते तेंव्हा पासुन महापौरांचा कार्यकाल गणला जातो. महापौरांचा कार्यकाल हा **२.५ वर्षे** इतका आहे. कार्यकाल

पुर्ण होण्याआधी महापौर आपला राजीनामा **विभागीय आयुक्तांकडे** देवु शकतो. तसेच महानगर पालिकेचे सदस्य व उपमहापौर हे आपला राजीनामा **महापौर** यांचेकडे देतात. **महापौर** हा शब्द विनायक दामोदर सावरकर यांनी सुचविलेला आहे.

- **महापौर अधिकार व कार्य :-** १) म न पा च्या बैठका बोलावणे व बैठकीचे अध्यक्ष स्थान भुषविणे २) म न पा च्या राजकीय व प्रशासकिय कार्यावर नियंत्रण ठेवणे ३) म न पा चे सर्व अभिलेख पाहणे ४) शहराचा प्रथम नागरिक असल्याने सार्वजनिक सभा समारंभामध्ये भाग घेणे ५) नगर आयुक्तांचा गोपनिय अहवाल शासनाकडे पाठविणे.
- **महानगर पालिका आयुक्त :-** हा भारतीय प्रशासन सेवेतील उच्च अधिकारी असतो. यांची निवड यु पी एस सी मार्फत केली जाते व नेमणुक **राज्य शासन** करते. आयुक्त हा महानगर पालिकेचा **प्रशासकिय प्रमुख** असतो. महानगर पालिकेचा प्रशासकिय कारभार आयुक्तांमार्फत चालविला जातो. राज्य शासन व महानगर पालिका यांचेतील दुवा म्हणुन तो काम करतो. महानगर पालिका आयुक्तांवर थेट **राज्य शासनाचे नियंत्रण** असते.
- **म न पा आयुक्तांची कार्ये :-** म न पा च्या सर्वसाधारण व विशेष सभांमध्ये सहभाग घेवुन आपले मत नोदंविणे, म न पा ने पारित केलेले ठराव व निर्णयांची अंमलबजावणी करणे, म न पा तील वर्ग ३ व ४ च्या कर्मचारी यांची नियुक्ती करणे, **मनपाचे अंदाजपत्रक तयार करणे** व मान्यतेकरीता स्थायी समितीकडे सादर करणे, महापौर व नगरसेवकांना महानगर पालिका कार्यांची माहीती देणे इत्यादी.
- **महानगर पालिकेच्या समित्या :-** केंद्र शासनाच्या ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार राज्य घटनेमध्ये कलम २४३ मध्ये राज्य विधीमंडळांना महानगर पालिकेमध्ये महानगर नियोजन समिती व वार्ड समिती स्थापन करण्या विषयी मार्गदर्शन केले जाते.
  १) **स्थायी समिती :-** म न पा मधील सर्वात महत्वाची समिती असते. मनपा कायद्यामध्ये या समितीची रचना अधिकार व कार्ये या विषयीची तरतुद करण्यात आली आहे. या समितीतील सभासदांची निवड मनपा तील निर्वाचीत सभासदांकडुन होते. या समिती मध्ये एकुण **१६ सदस्य** असतात. **प्रत्येक वर्षानंतर** या समितीचे **१/२ सभासद निवृत्त** होतात व त्याजागी तेवढेच नवीन सभासद निवडले जातात. स्थायी समितीमधील सभासदांचा कार्यकाल हा ०१ वर्षाचा असतो.
  २) **परिवहन समिती :-** या समितीमध्ये परिवहन, अभियांत्रीकी, वित्त व व्यापार, उदयोग व मजुर इत्यादी क्षेत्रातील अनुभवी तज्ञ सभासद असतात. या समितीचे सदस्य आपल्यातुनच एकाची सभासदाची सभापती म्हणुन निवड करतात. यातील सदस्य व सभापती यांचा कार्यकाल ०१ वर्षाचा असतो.
  ३) **शिक्षण समिती :-** यामध्ये एकुण १६ सदस्य असतात. यापैकी १२ सदस्य मनपा च्या निर्वाचित सदस्यांमधुन निवडले जातात व ०४ सभासद हे विविध क्षेत्रातील अनुभवी व्यक्ती असतात. या समितीचे सदस्य आपल्यातुनच एकाची सभासदाची सभापती म्हणुन निवड करतात. यातील सदस्य व सभापती यांचा कार्यकाल ०१ वर्षाचा असतो.
  ४) **महत्वाचे** :- **महानगर नियोजन समिती :-** १९९३ साली च्या ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार मनपा क्षेत्रामध्ये महानगर नियोजन समिती स्थापन करण्यात आली आहे. महानगर नियोजन समितीचे अधिकार व कार्ये राज्य विधी मंडळ कार्यानुसार निश्चित होतात. महानगराचा विकास व नियोजन आराखडा तयार करण्याची जबाबदारी या समितीवर असते.
  ५) **प्रभाग समिती :-** महानगर पालिकेच्या प्रादेशिक मतदार संघास **प्रभाग** किंवा **वार्ड** असे म्हणतात. ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार ज्या शहराची लोकसंख्या ०३ लाखांपेक्षा जास्त आहे त्या शहराच्या महानगर पालिकेत प्रभाग समित्या स्थापन करण्या आलेल्या आहेत. या समित्यांची संख्या किमान ०३ व कमाल २५ इतकी असते.
- **मनपा च्या उत्पन्नाची साधने :-** राज्य शासनाकडुन मिळणारे अनुदान, स्थानिक कर्ज, पाणिपट्टी, घरपट्टी, जकात इत्यादी कर, स्वतःची मालमत्ता विक्री करुन मिळविलेले उत्पन्न.

o **मनपा ची कार्ये :-** सार्वजनिक पाणी पुरवठा, आरोग्य सेवा उपलब्धता करुन देणे, जन्म मृत्युची नोंद ठेवणे, क्रिडांगणे, उद्याने, बगीचे आणि सार्वजनिक वाचनालये यांची स्थापना करणे, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, रोगराई निर्मुलन व स्वच्छता कार्यक्रमांची आंमलबजावणी करणे.

...............................................ooo...............................................

## नगर परिषद / नगर पालिका

o महानगर पालिका व नगर पालिका अधिनियम १९६५ नुसार नगर पालिकेची स्थापना करण्यात येते. आज महाराष्ट्रात **२२१ नगर परिषदा** आहेत. त्यापैकी १७ नगर परिषद (अ वर्ग), ६२ नगर परिषदा (ब वर्ग), १४२ नगर परिषदा (क वर्ग) आहेत. भारतात नगर परीषदेच्या निर्मीतीचे निकष वेगवेगळे आहेत. उत्तर प्रदेश, बिहार व आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये नगर परीषदेच्या **उत्पन्नावरुन** नगर परीषदेचे वर्गीकरण केले जाते. **महाराष्ट्र** व मध्यप्रदेश मध्ये **लोकसंख्येच्या प्रमाणानुसार** नगर परीषदेचे वर्गीकरण केले जाते.

o नगर परीषदेचे वर्गीकरण पुढील पद्धतीने केले जाते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| लोकसंख्या | :- | १ लाख ते ३ लाख | ४०हजार ते १ लाख | २५हजार ते ४० हजार |
| नगर परीषद वर्ग | :- | अ वर्ग | ब वर्ग | क वर्ग |
| सभासद संख्या | :- | ३८ ते ६५ | २३ ते ३७ | १७ ते २२ |

o **नगर परीषद सभासद पात्रता :-** भारताचे नागरीकत्व, वय २१ पुर्ण, त्याचे नाव न. प. मतदार यादी असणे आवश्यक, न. प. चा कर थकवाकीदार नसावा, १२ डिसेंबर २००१ नंतर तिसरे आपत्य झालेले नसावे.

o **आरक्षण :-** अनुसुचित जाती व जमातींना आरक्षण त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार राज्य शासन देते, इतर मागासर्वीय वर्गांना एकुण जागेंच्या २७ टक्के जागा दिल्या जातात, **महीलांना** नविन तरतुदीनुसार **५० टक्के** आरक्षण देण्यात आले आहे.

o **नगर परीषद कार्यकाल :-** न. प. च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर सर्वसाधारण कार्यकाल हा ०५ वर्षे इतका असतो. कार्यकाल संपन्यापुर्वी अकार्यक्षमता, गैरव्यवहार या कारणास्तव राज्य शासन न. प. बरखास्त करु शकते.

o **पदसिद्ध सभासद :- न. प. क्षेत्रातुन** संसद व राज्य विधी मंडळावर निवडुण आलेले सभासद हे नगर परीषदेचे पदसिद्ध सदस्य असतात.

o पदाधिकारी :- महाराष्ट्र न. प. व महानगर पालिका अधिनियम १९६५ नुसार प्रत्येक न. प. करीता एक नगराध्यक्ष व एक उपनगराध्यक्ष यांची निवड केली जाते. नगराध्यक्षाला नगर परीषदेचा **राजकीय प्रमुख** म्हणुन ओळखले जाते. न. प. च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर **पहील्या** सर्वसाधारण सभेमध्ये नगरसेवक आपल्यातुनच एकाची नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष म्हणुन निवड करतात. या बैठकीचे अध्यक्ष स्थान **जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी** भुषवितात.

o **नगराध्यक्षांचा कार्यकाल :-** नगर परीषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत जेंव्हा नगराध्यक्षांची निवड होते तेंव्हा पासुन नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षांचा कार्यकाल हा **२.५ वर्षे** एवढा असतो. नगर परीषदेचे **सदस्य व उपाध्यक्ष** आपला राजीनामा **नगराध्यक्षांकडे** देतात. नगराध्यक्ष हे आपला राजीनामा **जिल्हाधिकारी** यांचे कडे देतात.

o **नगर परीषदेच्या समिती :-** महाराष्ट्रात न. प. चे दैनंदिन कामकाज पार पाडण्याकरीता कांही समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. या समित्या फक्त अ व ब दर्जाच्या न. प. मध्ये असतात.

१) **स्थायी समिती :-** न. प. मधील सर्वात महत्वाची समिती असते. या समितीचा **पदसिद्ध अध्यक्ष नगराध्यक्ष** असतो. इतर सर्व विषय समित्यांचे सभापती हे स्थायी समितीचे सदस्य असतात. न. प. चे महत्वाचे निर्णय घेण्याचे काम ही स्थायी समिती करते.

२) **विषय समिती :-** प्रत्येक विषय समितीचे सभासद आपल्यातुनच एकाची सभापती म्हणुन निवड करतात. या समितीचा कार्यकाल **०१ वर्षाचा** असतो. महीला व बालकल्याण समिती मध्ये ७५ टक्केपेक्षा जास्त महीला सदस्य असतात. महीला व बालकल्याण समितीच्या सभापती या **महीलाच** असतात. नगर परीषदेमध्ये खालीलप्रमाणे कांही विषय समित्या कार्यरत आहेत.

I. सार्वजनिक बांधकाम समिती
II. पाणिपुरवठा व जल निसारण समिती
III. शिक्षण समिती
IV. नियोजन व विकास समिती
V. सार्वजनिक आरोग्य समिती

३) **प्रभाग समिती :-** नगर परीषदेच्या प्रादेशिक मतदार संघास प्रभाग असे म्हणतात. प्रभागातील नगरसेवक व स्थानिक जनतेच्या चर्चेने प्रभागाच्या समस्या सोडविण्याचे कार्य केले जाते.

- **मुख्याधिकारी :-** महाराष्ट्रात न. प. च्या प्रशासकीय प्रमुखास **मुख्याधिकारी** म्हणुन ओळखले जाते. मुख्याधिकाऱ्याचा दर्जा हा न. प. च्या दर्जानुसार ठरतो.
- अ वर्ग न. प. साठीच्या मुख्याधिकारी यांचे पद उपजिल्हाधिकारी दर्जाचे असते.
- ब वर्ग न. प. साठीच्या मुख्याधिकारी यांचे पद तहसीलदार दर्जाचे असते.
- क वर्ग न. प. साठीच्या मुख्याधिकारी यांचे पद कांही ठिकाणी वर्ग २ दर्जाचा तर कांही ठिकाणी वर्ग ३ दर्जाचा अधिकारी असतो. मुख्याधिकारी हे पद राज्य शासनाचे अख्यारीत असल्याने त्याचे बदली, बढती व वेतन तसेच इतर सर्व नियम **राज्य शासन** ठरवते. मुख्याधिकारी यांची नेमणुक न. प. मध्ये ०३ वर्षांकरीता केली जाते.
- **मुख्याधिकारी यांचे कार्ये :-** न. प. च्या सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे, न. प. च्या आर्थिक सुधारणा घडवुन आणण्याचा प्रयत्न करणे, नगराध्यक्षांच्या संमतीने अंदाजपत्रक तयार करणे, न. प. चे लेखे व जमाखर्च सांभाळणे, सर्व साधारण सभेस उपस्थित राहुन इतीवृत्त लिहीणे, न. प. च्या कर्मचारी वर्गावर देखरेख व नियंत्रण ठेवणे इत्यादी.

..................................................ooo..................................................

## नगर पंचायत

- महाराष्ट्रात सध्या ०५ नगर पंचायती आहेत. १) **शिर्डी,** अहमदनगर २) **कणकवली,** सिंधुदुर्ग ३) **दापोली,** रत्नागिरी ४) **केज,** बिड ५) **मलकापुर,** सातारा.
- महानगर पालिका, नगर पालिका व नगर पंचायत अधिनियम १९६५ अन्वये नगर पंचायतीचा कार्यभार चालविला जातो. महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्थेतील सर्वात **कनिष्ठ स्तर** म्हणजे नगर पंचायत होय.
- १९९२ पुर्वी लहान शहरांमध्ये टाऊन एरिया कमिटी आणि अधिसुचीत क्षेत्र समिती या अस्तित्वात होत्या. **७४ व्या** घटनादुरुस्तीनुसार या दोन संस्था ऐवजी नगर पंचायत ही स्थानिक नागरी संस्था अस्तित्वात आली. ग्रामिण भागाचे शहरी भागात रुपांतर होण्याच्या स्थितीत असणारी संस्था म्हणजे **नगर पंचायत** होय.
- **नगर पंचायतीची स्थापना :-** नगर पंचायतीला पुढील प्रमाणे निकष पार करावे लागतात.
  १) संबंधीत प्रदेशाची लोकसंख्या किमान १० हजार ते कमाल २५ हजार असावी.
  २) संबंधीत क्षेत्रात बिगर कृषी व्यवसायीकांचे प्रमाण ५० टक्केपेक्षा कमी असावे.
  ३) संबंधीत क्षेत्र **अ दर्जा असलेल्या** नगर परीषदेपासुन किमान २५ किलोमिटर दुर असावे.
  ४) नगर पंचायतीतील सदस्य हे लोकसंख्येच्या आधारावर निवडले जातात.
  ५) राज्य निवडणुक आयोगाच्या मदतीने **जिल्हाधिकारी** नगर पंचायतीच्या मतदार संघाची निर्मीती करतो.
- **७४ व्या** घटना दुरुस्तीनुसार भारतीय राज्यघटनेतील कलम २४३ (आर) यामध्ये नगर पंचायतीची रचना सांगीतली आहे. नगर पंचायतीमध्ये **०९ ते २०** दरम्यान सदस्य असतात.
- **सदस्यांची पात्रता :-** भारतीय नागरीकत्व असणे आवश्यक, वय २१ पुर्ण, राज्याच्या लोकसभा किंवा विधान सभेच्या मतदार यादीमध्ये नाव असणे आवश्यक.
- **कार्यकाल :-** नगर पंचायतीमध्ये सभासदांचा कार्यकाल ०५ वर्षे इतका असतो.
- **आरक्षण :-** अनुसुचित जाती जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणानुसार, इतर मागासवर्गीय वर्गांना २७ टक्के, नविन तरतुदीनुसार **महीलांना ५० टक्के** आरक्षण देण्यात आले आहे.
- **नगर पंचायतीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष :-** नगर पंचायतीच्या राजकीय प्रमुखास अध्यक्ष व उपप्रमुखास उपाध्यक्ष असे म्हणतात. नगर पंचायतीचे निवडुन आलेले सदस्य आपल्यातुनच एकाची अध्यक्ष व एकाची उपाध्यक्ष म्हणुन निवड करतात. परंतु सद्य स्थितीत अध्यक्षांची निवड मतदारांकडुन केली जाते.
- **महत्वाचे :-** १२ मे २००४ पासुन नगर पंचायतीच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांचा **कार्यकाल ०३ वर्षे** करण्यात आला आहे.
- नगर पंचायतीवर राज्य शासनाचे संपुर्ण नियंत्रण असते. जिल्हाधिकारी यांच्या द्वारे राज्य शासन नगर पंचायतीवर नियंत्रण ठेवते.

..................................................०००..................................................

## कटक मंडळे

- **कॅन्टॉन्मेंट बोर्ड**
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचाच एक प्रकार म्हणजे कटक मंडळे होय. कटक मंडळे ही ज्या ठिकाणी **सैनिक छावणी** असते अशा ठिकाणी स्थापन केली जातात. छावणीतील नागरी वस्तीला नागरी सुविधा पुरविण्याच्या हेतुन कटक मंडळे स्थापन केली जातात. **भारत, पाकीस्तान व बांग्लादेश** या देशामध्ये कटक मंडळे आहेत. भारतामध्ये एकुण **६२** कटक मंडळे आहेत. त्यापैकी **महाराष्ट्रात ०७** कटक मंडळे आहेत.

  १) औरंगाबाद
  २) अहमदनगर
  ३) कामठी, नागपुर
  ४) देवळाली, नाशिक
  ५) खडकी, पुणे
  ६) देहुरोड, पुणे
  ७) पुणेकॅम्प, पुणे

- **कटक मंडळांची स्थापना :-** ब्रिटीशांनी १९२४ साली कॅन्टॅांमेंट ॲक्ट पास करुन कटक मंडळे स्थापन केली. **भारत सरकारने १९५३** साली कटक मंडळांचा आढावा घेण्यासाठी **एस. के. पाटील** यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीने आपल्या अहवालामध्ये कटक मंडळांची पुर्नरचना करण्याचे व त्यातील लोकप्रतिनीधी वाढविण्याची शिफारस केली.
- **कटक मंडळांची वैशिष्ट :-** कटक मंडळांचे वर्गीकरण लोकसंख्येच्या प्रमाणात केले जाते. सदरचे वर्गीकरण ०३ प्रकारे केले जाते.

  १) **प्रथम श्रेणी कटक मंडळे :-** ज्या छावणीतील नागरी क्षेत्राची लोकसंख्या १० हजार पेक्षा अधिक असते अशा ठिकाणी प्रथम श्रेणी कटक मंडळे अस्तित्वात येतात. प्रथम श्रेणीची कटक मंडळे देशात एकुण ३० आहेत.
  २) **व्दितीय श्रेणी कटक मंडळे :-** ज्या छावणीची लोकसंख्या २५०० पेक्षा जास्त व १० हजार पेक्षा कमी असते त्या ठिकाणी व्दितीय श्रेणी कटक मंडळे अस्तित्वात येतात. देशात सध्या १९ व्दितीय श्रेणी कटक मंडळे आहेत.
  ३) **तृतीय श्रेणी कटक मंडळे :-** ज्या छावणीतील लोकसंख्या २५०० पेक्षा कमी आहे तेथे तृतीय श्रेणी कटक मंडळे अस्तित्वात येतात. देशात सध्या १३ आहेत.

- **कटक मंडळांची रचना :-** प्रथम श्रेणी छावणी मंडळात **१५ सदस्य** असतात. त्यामध्ये **०८ अनिर्वाचीत** तर **०७ निर्वाचित** सदस्य असतात. **छावणीचा प्रमुख अधिकारी** हा कटक मंडळाचा **पदसिद्ध अध्यक्ष** असतो. ०७ निर्वाचित सभासद हे आपल्यातुनच एकाची उपाध्यक्ष म्हणुन निवड करतात.
- **कार्यकाल :-** यामंडळातील निर्वाचित सभासदांचा कार्यकाल **०३ वर्षांचा** असतो. तर अनिर्वाचित सभासदांचा कार्यकाल हा कायम स्वरुपी असतो.

..................................................०००..................................................

## ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीची वैशिष्टे

- **७३ वी घटनादुरुस्ती :-** ग्रामिण भागात सत्येचे विकेंद्रीकरण करण्याकरीता पंचायत राज व्यवस्थेस घटनात्मक दर्जा देण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान **पी. व्ही. नरसिंहराव** यांनी २२ डिसेंबर १९९२ रोजी लोकसभेत पंचायत राज विधेयक मांडले. लोकसभेने या विधेयकाला संमती दिल्यानंतर २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्य सभेने या विधेयकास मान्यता दिली.
- २० एप्रील १९९३ रोजी या विधेयकास राष्ट्रपतींनी संमती दिली व पंचायतराज व्यवस्थेला **घटनात्मक दर्जा** मिळाला. संविधानातील **कलम २४३** मध्ये पंचायतराज व्यवस्थेविषयी तरतुद करण्यात आली व **७३ व्या** घटनादुरुस्तीनुसार संविधानात **११ वे परिशिष्ठ समाविष्ठ** करण्यात आले.
  १) **त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था** :- **७३** व्या घटनादुरुस्तीनुसार अधिनियमातील कलम **२४३ (बी)** नुसार कांही अपवाद सोडुन संपुर्ण भारतात **त्रिस्तरीय पंचायतराज** (ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था)व्यवस्था स्विकारली. यानुसार जिल्हा स्तरावर जि. प. , गट स्तरावर पंचायत समिती व ग्राम स्तरावर ग्रामपंचायत अस्तित्वात येते.
  २) **महत्वाचे :-** ग्रामसभेची तरतुद :- लोकसभा व विधान सभेची जननी म्हणजे **ग्रामसभा** होय. ग्रामसभा पंचायतराज व्यवस्थेचा मुलभुत आधार आहे. **७३ व्या** घटनादुरुस्तीनुसार प्रत्येक गावासाठी ग्रामसभा अनिवार्य केली आहे.
  ३) **२०१०** हे वर्ष केंद्र सरकारने **ग्रामसभा वर्ष** म्हणुन घोषीत केले होते.
  ४) **महत्वाचे :- राज्य वित्त आयोगाची तरतुद :- ७३ व्या** घटनादुरुस्तीनुसार राज्य वित्त आयोग स्थापन करण्याची जबाबदारी संबंधीत राज्याच्या **राज्यपालाकडे** देण्यात आली आहे. या घटनादुरुस्तीची अंमलबजावणी ०१ वर्षाच्या आत व त्यानंतर प्रत्येक **०५ वर्षानी** राज्य वित्त आयोग **राज्यपाल** स्थापन करतील.
  ५) **महत्वाचे :- राज्य निर्वाचन आयोगाची तरतुद :- ७३ व्या** घटनादुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याकरीता स्वतंत्र असे **राज्य निर्वाचन आयोग स्थापन** करण्यात आले. राज्य निर्वाचन आयोगाच्या **सदस्यांची व अध्यक्षांची** नेमणुक **राज्यपाल** करतो. महाराष्ट्राच्या सध्याच्या राज्य निवडणुक

आयुक्त **नीला सत्यनारायणन** (महाराष्ट्राच्या **पहील्या महीला** निवडणुक आयुक्त) या आहेत व राज्याचे मुख्य निवडणुक अधिकारी **देवाशिष चक्रवर्ती** हे आहेत.

- भारताचे **पहीले** निवडणुक आयुक्त :- सुकुमार सेन.
- राज्यघटनेच्या **कलम ३२४** नुसार **निवडणुक आयोग** अस्तित्वात आले आहे.
- भारताचे सध्याचे निवडणुक आयुक्त :- **एस वाय कुरेशी** (पहीले मुस्लिम निवडणुक आयुक्त) (१७ वे).
- भारताचे इतर निवडणुक आयुक्त :- १) एम व्ही सांपत २) व्ही ब्रम्हाशंकर हे आहेत.
- **२५ जानेवारी** हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणुन साजरा करण्यात येणार असल्याचे २०११ साली घोषीत करण्यात आले.
- सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधिश :- **सरोश होमी कपाडिया** हे आहेत.
- देशाचे पहीले सर न्यायाधिश **हिरालाल जे कनिया** हे होते.
- २६ जोनवारी **१९५०** रोजी देशाच्या **सर्वोच्च न्यायालयाची** स्थापना करण्यात आली.
- **मुंबई हायकोर्ट** हे देशातील **३ रे** उच्च न्यायालय **१८६१** साली अस्तित्वात आले आहे.
- देशातील **१ ले** उच्च न्यायालय म्हणुन **मद्रास** या न्यायालयाची स्थापना १८८६ मध्ये करण्यात आली.
- १८८६ साली **अलाहाबाद** हे देशातील **४ थे** हायकोर्ट स्थापन करण्यात आले होते.
- **फेडरल कोर्ट ऑफ इंडीयाची** स्थापना **१९३५** साली करण्यात आली होती.
- २००९ पासुन सध्या **सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधिशांची** संख्या १ सर्वोच्च + ३० इतर अशी **एकुण ३१** एवढी आहे.
- **नागरी स्थानिक संस्थांच्या** संबंधात स्वतंत्र कायदा करण्याकरीता पी व्ही नरसिंगराव सरकाने **७४ वी** घटनादुरुस्ती केली. पी व्ही नरसिंगराव यांचे आत्मचरित्र्य **द इनसाईडर (अंतस्थ)** हे वादग्रस्त ठरले.
- हे विधेयक १६ सप्टेंबर १९९१ रोजी लोकसभेत मांडण्यात आले होते. २२ व २३ डिसेंबर १९९२ मध्ये अनुक्रमे लोकसभेने व राज्यसभेने सदरचे विधेयक मंजुर केले.
- **७४ वी** घटनादुरुस्ती हा कायदा ०१ जुन १९९३ पासुन अंमलबजावणी करण्याचे ठरविले. त्याकरीता केंद्र सरकारने ०१ वर्षाची मुदत दिली. ३१ मे १९९४ पर्यंत या कायद्याची अंमलबजावणी व्हावी असे निर्देष केंद्र सरकारने सुचविले होते.
- नागरी स्थानिक संस्थांमध्ये सर्वात शेवटचा ०३ रा स्तर म्हणजे नगर पंचायत हे असते.

..................................................ooo..................................................

❖ **मुलकी प्रशासन**

## कोतवाल

- **कोतवाल :-** कोतवाल हा पुर्णवेळ काम करणारा **चतुर्थ श्रेणीतील ग्राम नोकर** आहे. कोतवालाची नेमणुक **तहसीलदार** करतात. कोतवालाची संख्या गावच्या लोकसंख्येवर अवलंबुन असते. मात्र **एखाद्या गावी एकाहुन अधिक कोतवाल** नेमण्याचा अधिकार राज्य शासनाच्या परवानगीने **जिल्हाधिकारी** यांना आहेत. गावची लोकसंख्या व त्याप्रमाणात कोतवालांची संख्या :- १००० पर्यंत ०१, १००१ ते ३००० पर्यंत ०२, **३००० हुन अधिक ०३** कोतवालांची नेमणुक करण्यात येते.
- **कोतवालाची वयो मर्यादा :-** कमीत कमी १८ ते जास्तीत जास्त ४५ वर्ष.
- कोतवाल पदी नेमणुक होण्याकरीता संबंधीत व्यक्तीने कुळ कायद्यात नमुद केलेल्या धारण क्षेत्रापेक्षा जास्त जमीन नसावी. कोतवालावर **नजीकचे** नियंत्रण **तलाठी** याचे असते. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने कोतवाल पोलीस पाटीलाला सहकार्य करतो. राज्यातील वंश परंपरागत किंवा वतनी गाव कामगाराची नियुक्ती **१९५९** या वर्षी रद्द करण्यात आली. महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम १९६७ हे मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्हयांना लागु नाही. कारण या जिल्हयांना ग्रामीण भाग जोडण्यात आलेला नाही.
- कोतवालास **०८ दिवसाची किरकोळ** रजा देण्याचे अधिकार **तलाठ्यास** आहेत. ०८ दिवसांपेक्षा जास्त रजा देण्याचे अधिकार **तहसीलदार** यांना आहेत.
- गावचे दप्तर वरीष्ठ कार्यालयात नेआण करण्याची जबाबदारी कोतवालावर असते. गावातील जन्म, मृत्यु, विवाह या बाबतची माहीती तो **ग्रामसेवकास** देतो. आवश्यक त्यावेळी गावकऱ्यांना चावडीवर बोलावण्याचे काम कोतवाल करतो. **गावात दवंडी देवुन** सरकारी आदेश जाहीर करणे, गावात घडलेल्या गुन्हयाबद्दल पोलीस पाटीलास माहीती देण्याचे काम कोतवाल करतो.
- अकार्यक्षमता या कारणामुळे कोतवालास **तहसीलदार** हे **निलंबीत** करु शकतात.

- **महत्वाचे :-** ०१ ऑगस्ट या दिवशी राज्यात **महसुली वर्षाची** सुरुवात होते.
- कोतवालाच्या रजेच्या काळात शेजारील गावचा कोतवाल त्याचे काम पाहतो.
- कोतवाल वयाची **६०** वर्षे झाल्यास निवृत्त होते.
- ०१ जानेवारी २०१२ पासुन कोतवालाचे वेतन **५००० रु** इतके करण्यात आले आहे.

## पोलीस पाटील

- **पोलीस पाटील :-** मुंबई नागरी कायदा १८८७ पासुन राज्यात पोलीस पाटील हे पद निर्माण करण्यात आले आहे. महाराष्ट्र मुलकी पोलीस अधिनियम १९६२ नुसार ०१ जानेवारी **१९६२** पासुन राज्यातील **वंशपरंपरागत पोलीस पाटीलाचे पद रद्द** करण्यात आले. महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम १९६७ नुसार **पोलीस पाटील** याची नेमणुक केली जाते.
- **महत्वाचे :-** पोलीस पाटीलाची **नेमणुक** उपजिल्हाधिकारी / **प्रांत अधिकारी** / उपविभागीय अधिकारी यांचे मार्फत केली जाते. पोलीस पाटीलाची **तात्पुरती** नेमणुक **तहसीलदार** हे करतात.
- पोलीस पाटीलासाठी **किमान २५ व कमाल ४५** वर्षे एवढे वय आवश्यक आहे. पोलीस पाटील या पदासाठी शिक्षणाची अट इयत्ता ६ वी एवढी ठेवण्यात आले आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये ४ थी उत्तीर्ण उमेदवाराचीही नेमणुक करता येते. पोलीस पाटीलाची नियुक्ती सुरुवातीस ०५ वर्षा करीता केली जाते व त्यानंतर ती ०५ वर्षाच्या पटीमध्ये ती वाढवली जाते. पोलीस पाटीलाचे निवृत्तीचे वय **६०** वर्षे एवढे आहे. पोलीस पाटीलास यास त्याचे पदाव्यतीरिक्त इतर कोणतीही नोकरी करता येत नाही. मात्र तो **गावातील शेती करु शकतो.**
- पोलीस पाटीलास ०८ दिवसांची किरकोळ रजा देण्याचे अधिकार **तलाठ्यास** आहेत. पोलीस पाटलाच्या इतर रजा मंजुर करण्याचे अधिकार हे **तहसीलदार** यांना देण्यात आले आहेत.
- पोलीस पाटलास गैरवर्तणुकीबाबत शासन करण्याचे अधिकार **उपविभागीय अधिकारी / प्रांत अधिकारी** यांना असतात.
- **पोलीस पाटीलाचे गाव पातळीवरील कार्ये :-** कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने बंदोबस्त राखणे, गुन्हयाची खबर पोलीसांना देणे, गुन्हा होण्यास प्रतिबंध करणे, विनापरवाना शस्त्र बाळगण्यास मनाई करणे. गावात नैसर्गिक आपत्ती व संसर्गजन्य रोगाचा फैलाव झाल्यास त्या संबंधीचा अहवाल पोलीस पाटील वरीष्ठांना देतो. गावपातळीवर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने कोतवाल पोलीस पाटील यास सहकार्य करतो. पोलीस पाटीलाच्या रजेच्या काळात शेजारील गावचा पोलीस पाटील काम पाहतो. पोलीस पाटीलाची नेमणुक करताना मागासवर्गीय तरुणांना प्राधान्य दिले जाते.
- .०१ जानेवारी २०१२ पासुन पोलीस पाटीलास **३००० रु** एवढे वेतन देण्यात येत आहे.

## तलाठी

- महाराष्ट्र राज्याच्या जमीन महसुल अधिनियमातील १९६६ **कलम ०७ नुसार** तलाठी हे पद अस्तित्वात आले.
- ग्राम पातळीवर महसुल विभागाचे **महसुल गोळा** करण्याचे महत्वाचे काम तलाठी करतो. तलाठ्याच्या काम करण्याचे जागेस **सज्जा** असे म्हणतात. तलाठ्याची नेमणुक **जिल्हाधिकारी** हे करतात. तलाठी हा ग्रामीण मुलकी प्रशासनातील महसुल खात्याचा **वर्ग ०३** चा अधिकारी आहे. तलाठ्यावर **नजीकचे** नियंत्रण **मंडल अधिकारी** याचे असते व **त्यानंतर तहसीलदाराचे** असते. महसुल खात्याचे गाव पातळीवरील दप्तर सांभाळण्याचे काम तलाठी करतो. गावाचा **नमुना क्रमांक, सात बारा उतारा, ८ अ उतारा** इत्यादी तलाठी संबंधीत असतो. तसेच गाव पातळीवरील **कुटुंब नियोजन** यशस्वी करण्याची जबाबदारी तलाठ्यावर असते.

- **महत्वाचे :-** भारतामध्ये कुटुंब नियोजन कार्यक्रम **१९५**२ मध्ये सुरु झाला. याचे पहीले कार्यालय **मुंबई** येथे स्थापन करण्यात आले होते. **१९६६** मध्ये हा कार्यक्रम **जि. प. कडे** सोपविण्यात आला.
- **गावपातळीवर** महसुल, तगाई वसुली, दुष्काळ इ. कार्यांशी तलाठी संबंधीत असतो. गावपातळीवर **पीक पाण्याची आणेवा**री ठरवण्याचे काम तलाठी करतो. गावातील जमीन धारकांच्या नोंदी ठेवण्याचे काम तलाठी करतो. गावपातळीवरील कौटुंबीक **शिधा पत्रिका / रॅशनकार्ड वितरण** तलाठी करतो. तसेच गावपातळीवरील निवडणुक संदर्भात सोपविलेली कामे तलाठी पार पाडतो.
- तलाठ्यास गैरवर्तणुकी बद्दल **शासन** करण्याचे अधिकार **उप विभागीय अधिकारी / प्रांत अधिकारी** यांना आहेत.
- गाव पातळीवर जमीन महसुल थकबाकीदार व जमीनीच्या अधिकार पत्रांची नोंद ठेवण्याची जबाबदारी तलाठ्यावर असते. गावपातळीवरील शासकीय जागेवरील **अतीक्रमण** संदर्भात **तहसीलदारास** माहीती पुरविण्याचे काम तलाठी करतो.

## तहसीलदार

- महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार प्रत्येक तालुक्यासाठी एक तहसीलदार व त्याला साहय करण्याकरीता एक किंवा अधिक **नायब तहलीसदार** नेमण्याचे अधिकार राज्य शासनास आहेत.
- तहसीलदार हा महसुल खात्याचा वर्ग १ चा अधिकारी असुन त्याची निवड महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होते व **नेमणुक राज्य शासन** करते.
- तालुक्यात शांतता व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन तहसीलदार हा **तालुका दंडाधिकारी** म्हणुन काम पाहतो. तहसीलदार हा तालुका स्तरावर निवडणुक यंत्रणेतील महत्वाचा घटक या नात्याने **तालुका निवडणुक अधिकारी** म्हणुन काम पाहतो.
- सर्कल ऑफीसर, तलाठी इ. अधिकाऱ्यांवर तहसीलदाराचे नियंत्रण असते. तालुका स्तरावर शेत जमीनीची बिगर शेतजमीन / NA ची तात्पुरती घोषणा करण्याचे अधिकार तहसीलदार यांना आहेत.
- तालुका स्तरावर पिकांची आणेवारी **घोषीत** करण्याची जबाबदारी तहसीलदार यांचेवर असते व त्यासंबंधीची माहीती तो वरीष्ठांना कळवितो. तसेच तालुका स्तरावर **सर्वे नंबरच्या सरहद्दी** तहसीलदार ठरवितो.
- गावपातळीवर पिकांची पाहणी **वर्षातुन ०२ वेळा** केली जाते. तालुका स्तरावर जमीन महसुल अधिनियम १९६६ नुसार महसुल विषय कार्य तहसीलदार पार पाडतो. **तालुका** स्तरावर **रोजगार हमी योजनेचा प्रमुख** या नात्याने तहसीलदार काम पाहतो.
- महाराष्ट्र जमीन महसुल संहिता २२ डिसेंबर १९६६ ला तयार करण्यात आली.

.................................................ooo.................................................

## उप जिल्हाधिकारी / प्रांत अधिकारी / उप विभागीय दंडाधिकारी

- महसुलाचा उप विभाग / प्रांत हा काही तालुक्यांचा मिळुन बनलेला जिल्हयाचा एक भाग असतो. या उप विभागावर / प्रांतवर उप जिल्हाधिकारी किंवा प्रांत अधिकारी म्हणुन अधिकारी नेमला जातो. उप जिल्हाधिकारी यांना कार्यक्षेत्रातील कामाचे स्वरुपानुसार प्रांत अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, उप विभागीय निवडणुक अधिकारी अशा विवीध जिम्मेदारी पार पाडावी लागते. यांची निवड राज्य सेवा आयोगामार्फत होते व नेमणुक राज्य शासनाद्वारे केली जाते.
- महसुल विषयक बाबी जिल्हाधिकारी व तहसीलदार यांचे मध्ये समन्वय साधण्याचे काम उप जिल्हाधिकारी हे करतात.

- **पोलीस पाटील** याची **नेमणुक** करण्याचे व त्यास गैरवर्तणुकीबाबत **शासन** करण्याचे **अधिकार** उपजिल्हाधिकारी यांना आहेत.
- **हंगामी पोलीस पाटील** याची नेमणुक करण्याचे अधिकार मात्र **तहसीलदार** यांना आहेत.
- उपविभागात शांतता व सुव्यवस्था संभाळण्याचे काम उपजिल्हाधिकारी हे करतात.

..............................................०००...............................................

## जिल्हाधिकारी

- **१७७२** मध्ये वॉरंट हेस्टींग या गव्हर्नरने **जिल्हाधिकारी** या पदाची निर्मीती केली. जिल्हाधिकरी हा जिल्हयातील **संपर्ण प्रशासनाचा प्रमुख** असतो. जिल्हाधिकारी या पदाची निवड केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत केली जाते व **नेमणुक** करण्याचे अधिकार **राज्य शासन** नेमणुक करते.
- आय ए एस पदाचे प्रशिक्षण **मसुरी, उत्तराखंड** येथे देण्यात येते.
- महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ च्या **कमल ७(१)** प्रमाणे राज्यातील प्रत्येक जिल्हयाकरीता ०१ **जिल्हाधिकाऱ्याची** तरतुद केली आहे.
- जिल्हाधिकारी हा **जिल्हयातील रोजगार हमी योजनेचा प्रमुख** असतो.
- **महत्वाचे :-** जिल्हाधिकारी हा जिल्हा नियोजन व विकास मंडळाचा **पदसिद्ध सचीव** असतो.
- अध्यक्ष - **पालकमंत्री**, उपाध्यक्ष - **विभागीय आयुक्त.**
- जिल्हा नियोजन मंडळाची **स्थापना १९७४** साली करण्यात आली.
- महत्वाचे :- जिल्हयामध्ये **शांतता व सुव्यवस्था** राखण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी हाच **जिल्हादंडाधिकारी** असतो.
- जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम **पोलीस अधिक्षक** यांचेवर असते.
- **जिल्हयाचा निवडणुक अधिकारी** म्हणुन सार्वजनिक निवडणुकांची व्यवस्था व त्या अनुशंगाने जनगणना, मतदार यादी बनविणे, अचारसंहिता राबविणे इ. कामांची जबाबदारी जिल्हाधिकारी यांचेवर असते. जिल्हयातील **परिवहन**

**मंडळाचा** तसेच **रस्ते बांधणी समीतीचा** तो **पदसिद्ध अध्यक्ष** जिल्हाधिकारी हा असतो. जिल्हा स्तरावर **मंत्री व व्हि आय पींच्या दौऱ्यांचा कार्यक्रम** जिल्हाधिकारी निश्चीत करतो.

- o तहसीलदार यांचे कडुन प्राप्त झालेला पीक अहवाल तो राज्य शासनाकडे पाठविण्याचे काम जिल्हाधिकारी करतो.
- o दुष्काळ व आवर्षण काळात **शासनाच्या परवानगीने** जिल्हास्तराव **शेतसारा माफ करण्याचे अधिकार** जिल्हाधिकारी यांना आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत जिल्हयामध्ये स्वस्त धान्य दुकाने उघडण्याची परवानगी **जिल्हाधिकारी** देतात.
- o जिल्हयात दंगल सदृष्य परिस्थिती निर्माण झाल्यास **जिल्हाधिकारी** हे **जिल्हा दंडाधिकारी** या नात्याने **गोळीबार**ाचे आदेश देवु शकतात.

..................................................ooo..................................................